**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक ०१/०७/२०२५ (मंगळवार)**

---

## अंमलीपदर्थाची वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद, २ आरोपी अटक, आरोपी अटक, कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक ३०/०६/२०२५ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, आरोपी नामे १) सावळा काशीराम देवकर आणि २)मनोज शंकर झाकनेकर हे त्यांच्याकडील हिरो होंडा स्प्लेडंर मोटार सायकल एम.एच.४० डी. बी. ६६४३ ने बायपास रोड या मार्गाने अंमली पदार्थ गांजाची विक्री साठी वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी बायपास रोडवरील शुभारंभ मंगल कार्यालया समोर नाकाबंदी केली. नाकबंदी दरम्यान संशयीत मोटर सायकल एम.एच. ४० डी. बी. ६६४३ ही मिळुन आली. मोटर सायकल चालक **आरोपी नामे १) सावळा काशीराम देवकर, वय ३० वर्ष, रा. वार्ड नं. ०३ आर्दश नगर, ब्राम्हणी आणि त्याचा साथीदार अरोपी नामे २) मनोज शंकर झाकनेकर, वय २१ वर्ष, रा. वार्ड न्र. ०३, आर्दश नगर, ब्राम्हणी,** यांची झडती घेतली असता त्यांच्या जवळ प्लास्टीकच्या पिशवीमध्ये अंमली पदार्थ मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष ८३१ ग्रॅम अंमली पदार्थ ओलसर गांजा किंमती १६,०००/— रुपये, एक अॅड्रॉईड मोबाईल किंमती ५,००० /— रुपये, आणि मोटार सायकल एम. एच. ४० डी बी ६६४३ किंमती १०,००,००/— रुपये असा एकुण **किंमती १,२१,०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.**

**वर नमुद दोन्ही आरोपीतांविरूध्द एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

# नागपुर ग्रामीण जिल्हयातील ३९५ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ३९५ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे १७ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे १८ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे २१ आरोपी अशा एकुण ५६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे १९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे १३ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे १४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर १७ आरोपी अशा एकुण ६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे २४ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे १५ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १० आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे १० आरोपी अशा एकुण ५९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे १३ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापरखेडा येथे २० आरोपी अशा एकुण ४५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे २१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे १७ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे १७ आरोपी अशा एकुण ७६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे १६ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३७ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २३ आरोपी अशा एकुण ९६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन एकुण ३९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**


पोलीस स्टेशन
एम.आई.डी.सी, बुटीबोरी
RR




पोलीस स्टेशन,रामटेक








## रात्र गस्त दरम्यान सावनेर उपविभागात कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक  आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ३०/०६/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०१/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त दरम्यान सपोनि श्री किशोर भुजाडे, प्रभारी अधिकारी,खापा यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन खापा, केळवद, सावनेर आणि कळमेश्वर या सर्व पोलीस स्टेशन हद्दीत सतर्कपणे गस्त करण्यात आली. पोलीस स्टेशन खापा अंतर्गत खापा टाउन आणि बडेगाव येथे कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. **पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत** पोलीस उपनिरीक्षक श्री स्वप्नील गेडाम, नेम पोलीस स्टेशन सावनेर  यांच्या नेतृत्वात पहलेपार, चिचपुरा, सटवा माता मंदीर, नाग मंदीर, सावनेर या परीसरात पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर वेळी पोलीस स्टेशन सावनेर येथील अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथक चे पोलीस अंमलदार हजर होते. तसेच सावनेर पोलीस स्टेशन हद्दीत गांधी चौक, शिवाजी चौक, राजकमल चौक, गडकारी चौक,अंबिका चौक येथे नाकाबंदी करण्यात आली. संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली . **पोलीस स्टेशन कळमेश्वर** हद्दीत श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री सुनिल मिश्रा, नेम. पोलीस स्टेशन कळमेश्वर यांच्या नेतृत्वात कळमेश्वर टाउन या भागात पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर वेळी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथक चे पोलीस अंमलदार हजर होते. तसेच तळयाची पार येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली.

सावनेर उपविभागात कोबिंग ऑपरेशन राबवुन रेकॉर्डवरील गुन्हेगार , जेल रिलीज गुन्हेगार, अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली






MH31EA5170




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने